MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Oct. To Dec. 2019
Issue-32, Vol-08

Date of Publication
01 Dec. 2019

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by : Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

14) महात्मा फुले यांचे स्त्री - शिक्षण विषयक व सामाजिक कार्य
प्रा. पालवे रामनाथ सुर्यभान, जालना ||71

15) सावनेर तालुक्यातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांच्या गळतीच्या कारणांचा ...
प्रा. रंजना व्ही. तिजारे, नागपूर ||74

16) अध्यात्मिक लोकशाहीतील संतांची भक्ती
Dr. Dilip Aher ||79

17) अध्यापन शास्त्रीय विश्लेषण आणि शिक्षक
प्रा.डॉ. प्र. अ. जगताप, पुणे ||81

18) विश्वस्ताच्या कर्तव्याला जागणारी स्त्री : अहिल्याबाई होळकर
डॉ. मुंढे सविता गंगाधरराव, जालना ||83

19) भारतीय संविधानातील कलम ३७०, संविधान आदेश- १९५४ आणि कलम ३५-ए
डॉ. प्रदीप बस्वराज पाटील, जि.लातूर ||87

20) बंजारा समाजातील पोट जात मथुरा लभाण यांचा समाज शास्त्रीय अभ्यास
प्रा. राठोड बी. जे., पाटोदा ||93

21) लोकसंस्कृती आणि लोकदैवते
प्रा.डॉ. सदाशिव सरकटे, गढी ||95

22) भारतीय मुस्लिम व दहशतवादाचा प्रश्न
डॉ. सय्यद आर. जे., उस्मानाबाद ||98

23) ठाणे जिल्हयातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा त्यांच्या ...
सौ. किशोरी भगवान ठाकुर, मुंबई विद्यापीठ ||101

24) सेज पर संस्कृत उपन्यास में चित्रित समस्याएँ
झाला भाग्यश्रीबा यु., राजकोट ||115

25) श्रीमद् भगवद्गीता की शिक्षा की विवेचना
भंडेरी शैलेष एस., राजकोट ||120

26) आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी जी का पत्र साहित्य
डॉ. बिपिनभाई एम. पटेल ||126

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Oct. To Dec. 2019
Issue-32, Vol-08


...ळी, मकरसंक्रांत, होळी, नागपंचमी, रक्षा बंधन, रामनवमी, ...ष्टमी, इ. सण उत्सव साजरे करतात.

...संस्कार :- मथुरा लभाण या जातीमध्ये जावळ काढणे, ...करण, उपनयन संस्कार, विवाह, अत्यंष्टी इ. संस्कार मुख्य ...ले जातात.

...र्ष : मथुरा लभाण हे सर्वच बाबतीत बंजारा पेक्षा वेगळे ...तात. बंजारा समाजापेक्षा त्याचा दर्जा वेगळा आहे असे ...जतात. स्वतःस श्रीकृष्णाच्या वंशाचे समजतात. त्याचे ...भिमान, वेशभूषा, केशभूषा, बोलीभाषा, संस्कार इत्यादी ...तीत वेगवेळेपण दिसून येते.

...:

१) डॉ. श्रीराम शर्मा, बंजारा समाज, दक्षिण प्रकाशन, ...बाजार, हैद्राबाद - १८९३.

२) डॉ. यशवंत जाधव, बंजारा जाती : समाज और ...ती, वाणी प्रकाशन दिल्ली, १९९२.

३) कै. बळीराम हिरामन पाटील, गोर बंजारे लोकांचा ...हास, यवतमाळ, १९१३.

४) श्री. रामनाथ चव्हाण, जाती आणि जमाती, मेहता ...ब्लिकेशन, पुणे - १९८९

५) Russel R.V. & Hiralal R.B. Tribe & ...aste, Central Provincess of India, SK. Jain ...ajdhani Bank Centre, Delhi, १९७५.

६) प्रा. मोतीराज राठोड, गोर बंजारा जनजाती का ...हास, विद्या प्रकाशन कानपूर, २००३.

७) श्री. हरिभाऊ राठोड, लमाण - बंजारा, सुबोधी ...काशन मुंबई, १९९४.

८) डॉ. सौ रुक्मिणी पवार, बंजारा लोकजीवन पद्धती, ...म पब्लिकेशन, औरंगाबाद, २००२.

९) जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश खंड ...पुणे, १९७०.

१०) प्रा. मोतीराज राठोड, गोर बंजारावंशाचा इतिहास, ...सिंग भानावत मेमोरियल ट्रस्ट पुणे, २००५.

❑❑❑

**21**

# लोकसंस्कृती आणि लोकदैवते

प्रा.डॉ. सदाशिव सरकटे
सहयोगी प्राध्यापक,
कला व विज्ञान महाविद्यालय गढी

**********

**प्रास्ताविक :**

भारत देश हा संस्कृती प्रिय असून भारतामध्ये प्राचीन व प्रगल्भ असणा-या संस्कृतीचे अंतरंग एकात्म, एकरूप झालेले आहे. हजारो वर्षापासून सर्व जाती धर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतात. मानव हा समूहशील व समाजशील प्राणी असून तो बुध्दीमान आहे. मात्र तो संस्कृतीच्या आणि सभ्यतेच्या आधाराने जगत असतो. माणसांच्या जीवनशैलीशी एक समूहमन सदैव निगडीत असते. मानवाच्या संस्कृतीवर नितीमत्तेच्या कल्पनांचा, कलेच्या आविष्काराचा, वाङमयाचा प्रभाव असल्याने लोकसंस्कृतीत तो रममाण होतो. पण आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानामुळे मानवाने भौतिक प्रगती अफाट केली आहे. या विकासाच्या मागे धावताना तो हजारो वर्षांची जी लोकसंस्कृती त्याच्या सुखसमाधानासाठी अत्यंत महत्वाची आहे तीच आज तो विसरत चालला आहे का? की भारतीय सांस्कृतिक ठेव्यापासून तो दूर तर जात नाही ना? सध्याच्या समाजजीवनातील जीवघेण्या स्पर्धा अनैतिकता, वाढती गुन्हेगारी, व्यसनाधीनता, अराजकता अशा अनेक गोष्टींमुळे तो मानवीमूल्ये पायदळी तुडवीत माणूसकी, प्रेम हरवत चालला आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे जर होकारार्थी असतील तर आजच्या संपूर्ण मानवी जीवनाला आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांची गरज आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी आपणाला आपल्या लोकसंस्कृतीकडे वळावे लागेल. भारतीय लोकांविषयी सांस्कृतिक संदर्भाने विचार मांडताना भालचंद्र नेमाडे म्हणतात की, "आपण जितके मागे जातो तितके आपण पुढे जातो" म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधागध्ये आपली लोकसंस्कृती व लोकदैवत कथा यांचे सामाजिक स्वरुप अभ्यासून त्याच्या योगदानावर भाष्य करावयाचे आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**



Scanned with CamScanner

१) लोकसंस्कृती आणि लोकदैवते यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.

२) लोकसंस्कृती आणि देवता संकल्पना समजून घेणे.

३) लोकदैवते आणि लोकसंस्कृतीचा आविष्कार कसा होतो हे पाहणे.

४) लोकदैवतांतून होणारे सांस्कृतिक दर्शन अभ्यासणे.

५) लोकदैवतांमुळेच कला आणि वाङमय निर्माण होते हे पाहणे.

६) माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवतांचे विश्लेषण करणे.

या उददेशाने प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषण करण्यात आले आहे.

**लोक, संस्कृती आणि देवता :-**

लोक हा शब्दच संस्कृतमधील लोकदर्शने या धातूपासून तयार झाला. याचा अर्थ पाहणे असा होतो. ऋग्वेदात जन या अर्थाने तो येतो तर इनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका या कोशात अप्रगत, असंस्कृत, अविकसित लोकसमूह म्हणजे लोक अशी व्याख्याच केलेली दिसते. तर जे खेडयात किंवा शहरात राहतात, ज्यांना स्वत:च्या सांस्कृतिक परंपरेचे व वैशिष्टयांचे भान असते, जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात ही परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. त्यांचे जीवन नैसर्गिक, सहज आणि स्वाभाविक असते अशी डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी व्याख्या केली आहे.

'देवता' या शब्दाचा भावार्थ असा की, जिच्याठायी दिव्यतेज अथवा सामर्थ्य असते ती देवता होय. जी दिव्य अशी शक्ती अदृश्य रुपाने सर्वत्र संचार करते, भक्ताची श्रध्दा, भक्ती उत्कट झाल्यास जी दृश्यरुपानेही अभिव्यक्त होते. ती पूजा व बळी यांचे ग्रहण करुन भक्तांच्या किंवा उपासकांच्या मनोकामना पूर्ण करते. जी भक्तांच्या मार्गातील अडथळे दूर करुन त्यांचे जीवन निर्भय व निराबंध करते या देवता असे स्पष्टीकरण भारतीय संस्कृती कोश खंड चौथा मध्ये दिले आहे.

संस्कृतीची व्याख्या करताना रायल यांनी "ज्ञान, विश्वास, कला, आजार विधी, रीती आणि जिच्यात अनेक गोष्टी सामावून घेण्याची क्षमता असते ती संस्कृती होय".

भारतीय संस्कृतीतील विविधता पाहता त्यामध्ये एकता ही दिसून येते. आणि लोकसंस्कृतीतील भिन्न लोकदैवते त्यांचा समाजमनावरील परिणाम त्यातून प्रकट होणारे सांस्कृतिक जीवन आपल्या लक्षात येते.

**लोकदैवते आणि लोकसंस्कृतीचा आविष्कार :-**

भारतीय लोकमानस श्रध्दाप्रिय असल्याने लोकदैवते ही त्यांची अपार श्रध्दास्थाने आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीमुळे मानवाचे भौतिक जीवन आमुलाग्र बदलले असले तरी लोकदैवतांविषयीची श्रध्दा आणि कृती कालही होती आणि आजही आहे. या श्रध्देपोटीच लोकविधी, धर्मविधी, रूढी, परंपरा, संस्कार विधी, सामाजिक विधी यातून समूहमनाचा आविष्कार होवून लोकजीवनाचे अविभाज्य भाग बनले. "आज प्रचलित असलेल्या रुढी प्रथा, लोकविश्वास कित्येक शतकांपूर्वी व्यक्ति मनातून लोकमानसात स्थित झाले आणि परंपरेने ते आजपर्यंत लोकमानसाने जतन करून ठेवले "? समूहमनाचे विविध पैलू येथे लक्षात घेण्यासारखे आहेत.

लोकदैवते ही केवळ हिंदूधर्मापुरतीच मर्यादित नाहीत तर संपूर्ण जगात ते सत्ता गाजविताना दिसतात. उदा. रोमन संस्कृतीत 'मानीज', 'लार' या कुलरक्षक देवता, द्राक्षांच्या शेतीचे रक्षणकरणारी 'व्हीनस' देवता, धान्य पिकाची रक्षण करणारी 'सेरेसित' देवता यांची उपासना व उत्सव रोम संस्कृतीत करतात कारण जन्मापासून मृत्युपर्यंत या लोकदेवता सामान्यांचे रक्षण करतात अशी मानवाची श्रध्दा आहे.

आज खेडयापाडयाचे चित्र बदलत आहे. शेकडो वर्षे कृषी जीवनात पिढयानपिढया कष्ट करत असलेल्या मानवाचे दु:ख वेदना, व्यथा यांना कोण वाली आहे का? आधुनिकतेच्या नावाखाली माणुसकी विसरत चाललेला समाज जर पुन्हा लोकसंस्कृतीकडे डोळस नजरेने जेव्हा पाहू लागेल तेव्हा निश्चितच त्याला त्यातून आत्मविश्वास मिळेल. ही शक्यता नाकारता येणार नाही असे वाटते.

**लोकदैवतांतून होणारे सांस्कृतिक दर्शन :-**

लोकसमूहाच्या मनात लोकदैवतांविषयी प्रचंड श्रध्दाभाव असल्याने त्यांच्या वर्तनातून याचे प्रत्यंतर दिसून येते. सदवर्तनाकडे लोकांचा कल या सांस्कृतिकतेतून आपोआपच वळलेला दिसतो.

भिन्न गावाच्या देवता भिन्न, त्या ठिकाणाचे मानकरी भिन्न यातून विविधता जरी आढळली तरी त्याचा उददेश एकच असतो, तो म्हणजे मानवी जीवनाला स्थैर्य आणि आनंद प्राप्त करणे.

यात्रा, जत्रेनिमित्त नोकरीला परगावी असलेला माणूस आपल्या मूळगावी येतो. संकोच न बाळगता तो परंपरा जोपासताना दिसतो. भक्तीभावाने सणउत्सवाप्रसंगी लोक एकत्र येवून आपुलकी आणि जिव्हाळयाने एकमेकांची विचारपूस करतात.



Scanned with CamScanner

लोकदैवतांविषयी असणाऱ्या श्रध्दा परंपरागत असून त्या आजही टिकून आहे. त्याचेच प्रतिबिंब सांस्कृतिक जीवनात उमटलेले दिसते. लोकदैवतांवरील श्रध्दा माणसाचे मनोबल तर उंचावतेच पण समूहाची एकात्मताही वाढवते हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतासारख्या निसर्गसंपन्न व अगणित खेडयांमध्ये कित्येक वस्तूंना लोकदैवतांचे स्थान दिलेले असून त्याचे प्रतिकात्मक मूर्तीकरण केले जाते. तर कधी त्यांना मानवीरूपही दिले जाते. माणसांचे दैवतीकरण आणि दैवतांना मनुष्यरूप देणे हे मानवांमधील सहज प्रवृत्ती आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे.

लोकदैवते ही लोकमानसाला भयमुक्त करतात. संरक्षण देताना दिसतात. त्यांचे अशा आकाक्षांचे मानसिक समाधान करण्यात लोकदैवते महत्वाची भूमिका बजावतात.

लोकसंस्कृतीच्या आचरणाचा उददेश हा वैचारिकतेपेक्षा भावनिक जास्त असल्याचे दिसते. त्यामुळे लोकदैवतांच्या उपासनेत श्रध्दा, प्रेम, आदर, वात्सल्य, परोपकार ही संस्कृतीची मूल्ये मानव जोपासतो/जोपासली जातात तोच आपला वसा आणि वारसा पुढील पिढीकडे संक्रमित होत जातो.

**लोकदैवते : कला आणि वाङमय -**

लोक संस्कृतीमध्ये लोकदैवत निर्माण झाल्यानंतर त्यांच्या पूजाअर्चा, विधी परंपरा यातून अनेकविध लोक उपासक निर्माण झाले. त्याच्याही पुढे परंपरा तयार होत गेल्या. या उपासकांच्या मार्फत लोकसंस्कृतीमध्ये विविध कला उदयास आल्या. या कलांच्या जोपासणेतून त्या त्या लोकदैवतांविषयीचे गुणगाण करण्यासाठी महत्व पटवून देण्यासाठी समाजातून अनेक प्रकारचे लोकवाङमय निर्माण झाले. लोकसंस्कृतीचे संवर्धन महाराष्ट्रामध्ये लोक संस्कृतीच्या अनेक उपासकांनी अत्यंत प्रभावीपणे व श्रध्दापूर्वक केलेले दिसून येते. त्यामध्ये वाघ्यामुरळी, गोंधळी, बहुरूपी, पोतराज, दंडारी, दशावतारी, पांगुळ, वासुदेव यांनी लोकधर्माबरोबरच लोकजागर करण्याचेही महत्वपूर्ण कार्य केले आहे. नृत्य, नाटय, गायन, अभिनय व रसाविष्कार यातून रंजन तर केलेच पण एक सांस्कृतिक ठेवा पुढील पिढयांकडे देण्याचे महत्वाचे कार्य झाले हे नाकारून चालणार नाही. कला आणि वाङमयाची गंगोत्री म्हणून लोकदैवतांकडे पाहावे लागेल.

लोकसंस्कृती हा लोकसाहित्याचा प्राणभूत, पायाभूत घटक आहे. ही संस्कृती निसर्गसंन्मुख असल्याने पंचमहाभूतांची पुजा लोकसंस्कृतीत होते. लोकसंस्कृतीमध्ये दोन प्रकारच्या दैवतांचे प्राबल्य जास्त जाणवते. ते म्हणजे पितृदेवता आणि मातृदेवता. उदा. पितृदेवतांमध्ये खंडोबा, जोतीबा, बिरोबा, भैरोबा तर मातृदेवतांमध्ये लक्ष्मीआई, मरिआई, जानाई, येडाई, यमाई, भवानीमाता अशा दैवतांचा समावेश होतो. प्रदेश परत्वे दोन्ही प्रकारच्या देवतांमध्ये नावात बदल झालेला दिसून येतो. या दोन्ही प्रकारच्या लोकदैवतांविषयीचे विपुल प्रमाणात वाङमय निर्माण झाले. तेच वाङमय आजच्या वर्तमान काळातील साहित्याला पोषकच आहे. या वाङमयातून लोकसंस्कृतीचा ठेवा, सामाजिक मूल्यांची शिदोरी आजच्या समाजमानसाला नित्योपयोगीच आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवते :**

पश्चिम महाराष्ट्रातील माणदेश हा प्रदेश कायम दुष्काळी असला तरी येथे लोकदैवतांची महत्वाची ठिकाणी आहेत. या लोकदैवतांच्या यात्रा, उत्सव, रूढीपरंपरा यातून माणदेशी लोक संस्कृती उदयास आलेली पहावयास मिळते. माणदेशात गवळी धनगर पशुपालक या समाजाची मोठी लोकवस्ती असून त्याआधारे जातीरचना ही आहे. माणदेशात शिख. शिंगणापूरचा शंभूमहादेव, करगणीचा लखमेश्वर, म्हसवडचा सिध्दनाथ, आरेवाडीचा बिरोबा यासारखी मोठी लोकदैवते आहेत. त्याचा जनमानसावर मोठा प्रभाव आढळतो.

माणदेशातील लोकदैवते वैष्णव परंपरेपेक्षा शैव परंपरेशी जास्त संबंधित असल्याचे दिसते. उत्पतीकथांच्या वेगवेगळया आख्यायिका आहेत. माणदेशी समाज आणि लोकसंस्कृतीत विलक्षण एकजीनसीपणा आहे. माणदेशातील लोकगीते, लोककथा म्हणी, लोकोक्ती, लोकनृत्य, लोककला, धार्मिक विधी, व्रतवैकल्ये, कुलाचार, कुलधर्म, रूढीपरंपरा, आचारविचार ग्रामदैवते व त्यांचे पूजाविधी समाजधारणा समजून घेण्यासाठी लोकसंस्कृती महत्वाची वाटते. माणदेशातील लोकसंस्कृतीला एक संपन्न असा प्राचीन वारसा असल्याचे दिसते. इतरत्र न आढळणारा लोकसंस्कृतीचा घटक म्हणजे माणदेशी गजीनृत्य. हे एक वेगळेपण आहे. माणप्रदेशावर निसर्गाची अवकृपा झ..ली असली तरी येथील लोक संस्कृतीमध्ये माणुसकीचे झरे अखंड वाहताना दिसतात. अलिकडील काळात विकासाचा झोत आला असला तरी समूहमनातील लोकसंस्कृतीचा ठेवा कायम आहे. माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवतांचे वेगळेपण हे खास माणदेशीच आहे .

**निष्कर्ष :-**

१. लोकदैवते ही कृषिनिष्ट व्यक्तिचा प्रभावशाली अविभाज्य भाग असून संबंधित व्यक्तीची समूहांतर्गत वर्तनप्रक्रिया



Scanned with CamScanner